# भूदान-यज्ञ !

## पोवाडा : ३२ :

### चौक १ ला

भूदानाचा मार्ग खरा हा पुण्याईचा मार्ग भला। इहपरलोकीं मार्ग सुखाचा असा न दुसरा मार्ग खरा ॥ सत्य अहिंसा समता साधुनि मानवतेला तुष्ट करा । जिथें विषमता दुःखें तेथें बोल हिताचे मनीं धरा ॥ चाल ॥ इंग्रजी राज्य जरि गेलें । तरि नसे सुखाचें वारें ॥ राजकीय क्रान्ती झाली । विषमता परी नच गेली ॥ चाल ॥ उच्चनीच हा गरीब धनवान् रावरंक या भेदानें । दैवी शक्ती निघुनी गेली सांगावें हें खेदानें ॥ एकापाशीं जमीन भारी दुसऱ्यापाशीं नच जागा । सुखी कसा तो समाज होईल ? समाजकार्या या जागा ॥ चाल ॥ एकास मिळे भरपूर । तर दुसरा दारोदार । एकास जमीन भरपूर । तर दुसरा उपाशी फार ॥ जी ॥ एकास वस्त्र भरपूर । दुसऱ्यास न चिंधीभर ॥ जी ॥ चाल ॥ ही स्थिती भयानक करिल नष्ट सर्वाला ॥ मग द्वेष येईल जन्माला । सूडाची ज्योत पेटेल जागोजागेला ॥ मत्सर वैरी सर्वाला । मग समाज मातीमोल झाला । म्हणुन माझ्या देशबंधुनो ! विचार जरा करा ॥ जी ॥ १ ॥

● ●

### चौक २ रा

रक्तलांच्छिता क्रांती किंवा क्रान्ति अहिंसावृत्तीनें । मार्ग असे हे दोन क्रान्तिचे करती क्रांति झपाट्यानें ॥ चाल ॥ पण रक्तलांच्छिता क्रान्ती । सुस्थिर कधीं नच झाली ॥ चाल ॥ रक्तानें रक्त घेण्याची इच्छा होईल ।



द्वेषानें द्वेष भडकेल । मग वणवा जागोजागेला पेट घेईल ॥ जी ॥ चाल ॥ जसं सुंदर वन असावं । पक्ष्यांनीं तिथं नांदावं । वाटसरूंनीं तेथें बसावं । फळं खाउन संतुष्ट व्हावं । पण ज्वालामुखी एकदम भडकावा अन् पार सारं जाळून टाकावं । तसा धक्का बसेल समाजाला । मग गुलामगिरी नशिबाला । म्हणून मार्ग रक्तक्रांतिचा दिसे नच बरा ॥ २ ॥

● ●

### चौक ३ रा

सत्य, अहिंसा, त्यागबलानें गांधी महात्मा तो लढला । देश खडाडुन जागा केला इंग्रज मग निघुनी गेला ॥ पूज्य विनोबा शिष्य तयांचे फिरती गांवोगांवाला । भूमिदानाचा मंत्र सांगती सगळ्या भारत जनतेला ॥ जी ॥ द्रष्टा नेता योगी त्यागी शिष्य खरा हा गांधींचा । देशोदेशीं पायिं फिरुनी सल्ला देती मोलाचा ॥ जी ॥ चाल ॥ भारतांत तेलंगण । तिथं सुरू केलं भूदान ॥ जमीनदार देती जमीन । गरिबांना दिली वाटून ॥ अशी क्रांती केली शांतीनं । मग चालले समाधानानं ॥ चाल ॥ विनोबांनीं बिहार देशांत दौरा सुरू केला ॥ तिथं भरघोंस यश कार्याला । भूदान चळवळीचा जोर वाढतच गेला ॥ आले अंकुर जागोजागेला । जागजागीं यज्ञ सुरू झाला । महाराष्ट्रदेशा, तूं झोपूं नको या वेळा ॥ ३ ॥

● ●

### चौक ४ था

द्रव्यदानानें कार्य न पुरतें, तृप्ती होईल बेताची । श्रमदानानें वैभव वाढेल भरभराट ही देशाची ॥ तपोदानानें कार्यशक्तीची वाढ होतसे राष्ट्रांत । ज्ञानदानानें अज्ञानाचा नाश होतसे जनतेंत ॥ भूदानानें सद्गति लाभे इहपर मोलाचा ठेवा । समाज सुस्थिर प्रगतिपथावर राहिल मनिं हें तुम्ही ठेवा ॥ सर्व लेकरें भूमातेला सारखीच तीं

आवडती । सुख एकाला तें सर्वाला दुःखाची ही तीच गती ॥ चाल ॥ म्हणून ऐका बंधुनो, ऐका बोल हितकारी ॥ भूदान करुनिया जोडा पुण्य संसारीं ॥ या राष्ट्रामधिं तो कोणि नकोच भिकारी ॥ चाल ॥ चला आतां लागा कामाला। नका देऊं जागा आळसाला । हिंसेला नका देऊं थारा । या भरतभूमिला सुजला सुफला करा ॥ चाल ॥ शाहिर **पांडुरंगाचे** । बोल हृदयाचे । असती प्रेमाचे । करावे सफल विनवि तुम्हास । नसे मज कसला दुसरा हव्यास । **विनोबाचरणीं** लीन हा दास ॥ ४ ॥

रचना–२–२–१९५४.